# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३९८-२२ दिनांक २९/१२/२०२२

## गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या दोन अड्ड्यावर गुन्हे शाखा कक्ष -३ कडुन कारवाई.

मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दितील अवैद्य धंदयावर प्रभावीपणे पायबंद करणेबाबत वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हे शाखा कक्ष -३ चे दोन वेगवेगळे पथक तयार करण्यात आले होते.

दिनांक २८/१२/२०२२ रोजी गोपणीय बातमीदाराचे मार्फतीने माहिती मिळाली की मौजे अर्नाळा बंदरपाडा, हनुमान लखु म्हात्रे यांचे घराचे समोर रोडचे पलीकडे टेम्पररी शेडमध्ये बेकायदा गावठी हातभट्टीची दारु तयार होत आहे. मिळालेल्या बातमीवरुन सदर ठिकाणी छापा घालुन करण्यात आलेल्या कारवाई मध्ये इसम नामे - हेमंत नारायण म्हात्रे वय-६८ वर्षे हा ९६,५०० /- रु. किमंतीची बेकायदा गावठी हातभट्टीची दारु व दारु तयार करण्याची साधने बाळगून, गावठी हातभट्टीची दारु तयार करीत असतांना मिळुन आला. सदर कारवाईबाबत नमुद आरोपीत याचेविरुध्द पो.हवा/ ०७०८२ मनोज सुरेश सकपाळ नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांनी सरकारतर्फे अर्नाळा पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने गुन्हा रजि नंबर ४११ /२०२२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(फ) वैगरे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच दिनांक २८/१२/२०२२ रोजी गोपणीय बातमीदार याचे मार्फतीने मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने मौजे अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत अर्नाळा बंदरपाडा, वसंत मेहेर यांचे घराचे पाठीमागे टेंम्पररी शेडमध्ये छापा टाकुन करण्यात आलेल्या कारवाईमध्ये इसम नामे विशाल भालचंद्र तांडेल वय-२४ वर्षे हा २,४६,५००/- रु. किमंतीची गावठी हातभट्टीची दारु व दारु तयार करण्याची साधने बाळगून गावठी हातभट्टीची दारु तयार करीत असतांना मिळुन आला. म्हणुन नमुद आरोपीत विरुध्द पो.हवा/ ०५०३८ मनोज मनोज चव्हाण नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांनी सरकारतर्फे अर्नाळा पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली असुन सदर बाबत गुन्हा रजि नंबर ४१० /२०२२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(फ) वैगरे प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरच्या दोन्ही कारवाईमध्ये गुन्हे शाखा कक्ष -३ व्दारे वरनमुद करण्यात आलेल्या वेगवेगळया कारवाईदरम्यान गैरकायदा गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या भट्टया व दारु तयार करण्याची साधने असा एकुण ३,४३,०००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल नाश करण्यात आला आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद

बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/उमेश भागवत, पोहवा/ ९६०४१ अशोक पाटील, पो.हवा/ ०५०३८ मनोज चव्हाण, पो.हवा ०७०८२ मनोज सकपाळ, पो.हवा/ ०६११५ सचिन घेरे, पोहवा/ ०७०९३ सागर बारावकर, पो.हवा/१२०४५ अश्विन पाटील, पो.अं./ ०७१४९ राकेश पवार, पो.अं./१३१३७ सुमित जाधव, मसुब प्रविण वानखेडे, मसुब. सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ यांनी पार पाडली आहे.

---ooo---